पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी : ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), Ext- १२५ फॅक्स : ०२१७-२३५१३०
संकेतस्थळ : www.sus.ac.in ई-मेल: phd@sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++ Grade (CGPA 2.96)

संशोधन विभाग | Research Section

संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/ दिनांक :-

परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाच्या पीएच.डी. PET-10-(2026) प्रवेश परीक्षेची जाहिरात दि. १४/१०/२०२६ रोजी वर्तमानपत्रात व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार PET-10-(2026) पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन फॉर्म भरतेवेळी विद्यार्थ्यांकडून विषय, विद्याशाखा, इत्यादी बाबी चुकीच्या निवडल्या गेल्याने त्या दुरुस्तीसंदर्भात विद्यार्थ्यांकडून विद्यापीठास ईमेल पत्रव्यवहाराव्दारे व भ्रमणध्वनीवर संपर्क केला जात आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ संलंग्नित महाविद्यालय व संकुलातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, PET-10-(2026) पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा फॉर्म भरतेवेळी ज्या विद्यार्थ्यांकडून विषय, विद्याशाखा, इत्यादी बाबी चुकीच्या निवडण्यात आलेल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांनी फॉर्ममधील दुरुस्तीसंदर्भात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या शेवटच्या दिवशीपर्यंत म्हणजेच दि. १६/११/२०२६ रोजीपर्यंत खालील तक्त्यात दर्शविलेल्या ईमेलवर पत्रव्यवहार करुन खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर दुरुस्तीसाठी पाठपुरावा करावा, जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या फॉर्ममध्ये विहीत मुदतीत दुरुस्त्या होतील.

अ.क्र.	फॉर्ममधील दुरुस्तीसाठी पत्रव्यवहार करावयाचा ईमेल	फॉर्ममधील दुरुस्तीसाठी ईमेल केल्यानंतर पाठपुरावा करावयाचे भ्रमणध्वनी क्रमांक
१	pahsuphd@admissiondesk.org	9152252026 / 9152252077 / 9152252049

तसेच पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या शेवटच्या दिवसानंतर म्हणजेच दि. १६/११/२०२६ रोजीनंतर PET-10-(2026) पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या फॉर्ममधील दुरुस्तीबाबतचे प्राप्त ईमेल / अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

डॉ. अ.सु.साळुंखे
उपकुलसचिव

संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/2026/ 10064 दि. 03/11/2026

प्रती,

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ
४) सर्व शैक्षणिक संकुल / विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ
५) मा. प्राचार्य / संस्थाचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय
६) गोपनीय फर्म

सदरचे परिपत्रक आपल्या विभाग / संकुल व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे.